नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १७८ Issue - 178 | वार सोमवार दि. १७ नोव्हेंबर २०२५ Blow- Monday Date 17 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यभरात तापमानाचा पारा घसरला

## थंडीचा कडाका अजून वाढणार; परभणीत तापमान १० अंशाखाली



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्यातील बहुतांश भागात थंडीचा कहर पाहायला मिळत आहे. जवळ जवळ सर्वच जिल्ह्यात किमान तापमानात घट होण्यास सुरुवात झाली असून सर्वत्र थंडीची लाट (ढशाशिर्रींीश ऊैं) पसरल्याचे चित्र आहे. दरम्यान पुढील आठवडाभर मुंबई पुण्यासह कोकण, मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात थंडीची हुडहुडी कायम असणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. तर वाढत्या थंडीमुळं ठिकठिकाणी शेकोट्या पेटल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. सोबतच राज्याच्या उत्तरेकडील जिल्ह्यांपासून मराठवाड्यापर्यंत पुढील काही दिवसांत तापमानात लक्षणीय घसरण होईल, असा इशाराही हवामान विभागाने दिला आहे.

राज्यात एकीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या निमित्ताने राजकीय वातावरण तापत असताना दुसरीकडे मात्र थंडीचा कडाका देखील जाणवण्यास सुरुवात झाली आहे. रविवारी धुळ्यात ८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. या थंडीचा आनंद घेण्यासाठी नागरिक सकाळीच घराबाहेर पडण्यास सुरुवात झाली आहे. पुढील काही दिवसांमध्ये थंडीचा कडाका अजून वाढणार असल्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. थंडीमुळे जागोजागी शेकोट्या पेटू लागल्या असून उबदार कपड्यांच्या विक्रीत देखील मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे.

परभणी शहरासह जिल्ह्यात मागच्या आठवडा भरापासून थंडीची लाट कायम आहे. तापमान हे १० अंशखाली गेल्याने प्रचंड गारठा निर्माण झालाय. हवेमध्ये गारवा असल्याने दिवसभर थंडी कायम राहत आहे. त्यामुळे शाळकरी विद्यार्थी, वृध्द,नागरिकांकडून उबदार कपड्यांचा वापर केला जातोय. तसेच सकाळी ग्रामीण भागातून शहरात येणारे दूध विक्रेते, भाजी विक्रेते यांना या थंडीचा जास्त फटका बसत आहे. थंडीपासून बचावासाठी ग्रामीण भागासह शहरा- तही शेकोट्या पेटत आहेत. दुसरीकडे रबी पीक ज्यात गहू, हरभरा या साठी ही थंडी पोषक आहे.

महाबळेश्वर मिनी काश्मीर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाबळेश्वरमध्ये गेल्या काही दिवसांपासून थंडीमध्ये कमालीची वाढ झाली आहे. आठ दिवसांपासून तापमानात घसरण होऊ लागल्याने थंडीचा कडाका वाढू लागला आहे. दिवसभर कडक ऊन आणि रात्री गारठा वाढू लागला आहे. या कडाक्याच्या थंडीसोबतच गार वारेही वाहूत असल्याने पर्यटनास आलेल्या पर्यटकांसह स्थानिक नागरिक थंडीत गारठले आहेत.महाबळेश्वर शहरामध्ये किमान १०.२अंश सेल्- सअस तापमानाची नोंद होत असून, वेण्णा लेक परिसरात त्याहून तापमानाची कमी नोंद होत आहे.. थंडीच्या प्रमाणात वाढ झाल्याने सकाळी वेण्णा लेकवर पर्यटक फिरकत आहेत. कडाक्याची थंडी ही महाबळेश्वरची नजाकत दाखवत असून, या थंडीमुळे निसर्गाची विविध आकर्षक रूप आणि सृष्टीसौंदर्य पाहावयास मिळत आहे.

महाबळेश्वर सोडून काही किलोमीटर अंतर सोडून गेल्यावर बोचरी थंडी व महाबळेश्वरमध्ये असलेली गुलाबी थंडी यातील फरक पर्यटक अनुभवत आहेत. पर्यटकांसह स्थानिकही थंडीपासून बचाव होण्यासाठी स्वेटर, कानटोपी, जॅकेट्सचा आधार घेत आहेत. थंडीचा मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना, दूध विक्रेत्यांना, औद्योगिक वसाहत मधील कर्मचाऱ्यांना सामना करावा लागत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील सातपुड्याच्या दुर्गम भागात तापमानाचा पारा चांगलाच खाली गेला असून थंड हवेचे ठिकाण म्हणून आ- ओळख असलेल्या तोरणमाळ येथे तापमान१३ अंश सेल्सिअस पेक्षा खाली गेल्याने चांगलीच हुडहुडी भरली आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी शेकोटीचा आधार घेतला जात आहे. घटत्या तापमानाचा सातपुडा जीवनावर परिणाम होण्यास सुरुवात झाली असून सकाळी उशिरापर्यंत रस्ते ओस पडले असल्याचे चित्र दिसून येत आहे. तर रात्रीही थंडीपासून बचावासाठी शेकोट्या पेटताना दिसून येत आहेत. येत्या काही दिवसात तापमान अजून खाली जाण्याचा अंदाज हवामान खात्याच्या वतीने व्यक्त करण्यात आला असून थंडीचे प्रमाण वाढले असल्याने ग्रामीण भागातही रब्बी हंगामाच्या प्रेरणांनी वेग घेतल्याचे चित्र दिसून येत आहे.

# दिल्ली ब्लास्ट प्रकरण! एनआयएकडून मोठी कारवाई, आय २० कारचा मालक आमिर राशिदला अटक, उमरसोबत रचला दहशतवादी कट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : दिल्ली ब्लास्ट प्रकरणी छख कडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. ळ २० कार विकत घेणाऱ्या आमिर राशिद अलीला अटक करण्यात आली आहे. आमिर राशिद अलीला दिल्लीतून अटक करण्यात आली आहे. आमिर अलीने हल्लेखोरासोबत कट आखला होता. आमिर राशिद अली हा जम्मू काश्मीरमधील पुलवामा येथील रहिवासी आहे. प्लंबर म्हणून तो काम करत होता.


दिल्ली लाल किल्ला स्फोटात राष्ट्रीय तपास यंत्रणेला मोठे यश मिळाले आहे. एनआयएने आय२० कारचा मालक आमिर रशीद याला अटक केली आहे. आमिरने डॉ. उमरसोबत मिळून दिल्लीत दहशत माजवण्याचा धोकादायक कट रचला होता. आमिर हा जम्मू आणि काश्मीरमधील पंपोर येथील सांबुरा येथील रहिवासी आहे. आत्मघातकी हल्लेखोराने कारमध्ये स्फोट घडवण्यासाठी आयईडीचा वापर केला, ज्यामध्ये १३ जणांचा मृत्यू झाला आणि ३२ जण जखमी झाले, असा महत्त्वपूर्ण खुलासा एनआयएने केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, स्फोटात वापर- लेली कार अमीरच्या नावावर नोंदणीकृत होती. तो वाहनातून बाहेर पडणाऱ्या आयईडीमध्ये रूपांतरित होण्यापूर्वी गाडी खरेदी करण्यासाठी मदत मागण्यासाठी दिल्लीला गेला होता. फॉरेन्सिक चाचण्यांमध्ये मृत चालकाची ओळख डॉ. उमर उन नबी अशी झाली आहे, जो फरीदाबादमधील अल फलाह विद्यापीठातील जनरल मेडिसिन विभागातील सहाय्यक प्राध्यापक आणि पुलवामा जिल्ह्यातील रहिवासी आहे. एनआयएने नबीचे आणखी एक वाहन देखील जप्त केले आहे, ज्याची आता पुराव्यासाठी तपासणी केली जात आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दिल्ली लाल किल्ला स्फोटाप्रकरणी अटकेत असलेल्या तीन डॉक्टरांसह चार जणांना रविवारी एनआयएने सोडले आहे. तपासात मुख्य आरोपी डॉ. उमर उन नबीशी त्यांचे कोणतेही ठोस संबंध आढळले नाहीत.

दिल्ली पोलिस, हरियाणा पोलिस, उत्तर प्रदेश पोलिस आणि जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी इतर एजन्सींच्या सहकार्याने ७३ साक्षीदारांच्या मुलाखती घेतल्या आहेत. ज्यात अनेक जखमींचा समावेश आहे. अनेक राज्यांमध्ये तपास सुरू आहे. कारण अधिकारी व्यापक कट उघड करण्यासाठी आणि हल्ल्यात सहभागी असलेल्या सर्वांची ओळख पटवण्यासाठी सुगावा शोधत आहेत.

# बिहारमध्ये तेजस्वींच्या सभांना एआयची गर्दी होती का? : निकालावरून उद्धव ठाकरे यांचा आरोप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेसकडून स्वबळाचाना नारा देण्यात आल्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे कोणती भूमिका घेणार चर्चा रंगली होती. मात्र, उद्धव ठाकरे यांनी अवघ्या तीन शब्दांमध्ये काँग्रेसचा निर्णयावर प्रतिक्रिया दिली. आमचा निर्णय घेण्यासाठी आम्ही समर्थ आ- होत, तर त्यांचा निर्णय ते घेण्यास समर्थ असल्याचे ठाकरे म्हणाले. उद्धव ठाकरे म्हणाले की, त्यांचा पक्ष स्वतंत्र आहे. माझा पक्ष माझ्यासाठी स्वतंत्र निर्णय घेण्यासाठी समर्थ आहे. उद्धव ठाकरे यांनी फार गंभीरतेने काँग्रेसच्या स्वबळाचा निर्णय घेतला नाही. दरम्यान उद्धव ठाकरे यांनी बिहार निवडणुकीच्या निकालावरही भाष्य केले. सीएम देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या प्रतिक्रियेवर खोचक टोला लगावला. ठाकरे म्हणाले की तेजस्वींच्या सभांना मोठा प्रतिसाद लाभत होता. मग तो काय एआयच्या माध्यमातून होता का? अशी विच- ारणा उद्धव ठाकरे यांनी केली. ज्यांच्या सभांना गर्दी होत नाही ते कसे जिंकले? बिहारचे गणित अनाकलनीय असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. ते पुढे म्हणा- ले की या निवडणुकीमध्ये महिलांच्या खात्यामध्ये दहा हजार रुपयांचा महत्त्वाचा फॅक्टर ठरला असावा. मुख्यमंत्र्याचा चेहरा निवडण्यासाठी एक महिन्यांचा कालावधी लावण्यात आला होता. त्यामुळे बिहारमध्ये किती वेळ लावणार हे पहाव लागेल, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

वाढीव मतदारांवरूनही उद्धव ठाकरे यांनी भाष्य केले. ते म्हणाले की, की वाढणारे मतदार कुठून येतात हे पहावं लागेल. आमचा निवडणुकींना विरोध नसल्याचेही त्यांनी यावेळी सांगितलंय प्रादेशिक पक्षांच्या मोदींच्या भूमिकेवरूनही उद्धव ठाकरे यांनी टीका केली. प्रादेशिक पक्षांना संपवण्याचे वक्तव्य मोदी यांचं होतं, असंही उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

दरम्यान, मुंबईमध्ये उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येण्याची चर्चा रंगली आहे. गेल्या काही दिवसांमध्ये त्यांची वाढलेली जवळीक पाहता दोन्ही बंधू एकत्रितपणे मुंबई महानगरपालिका तसेच ठाणे, कल्याण डोंबिवली मनपा निवडणुका एकत्र लढतील असे चित्र आहे. त्यामुळे काँग्रेसकडून मनसेला थेट विरोध सुरू आहे. त्यामुळे काँग्रेसच्या झालेल्या बैठकीमध्ये स्वबळाचा नारा देण्यात आला. दुसरीकडे स्थानिक पातळीवर निवडणुका लढवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मोकळीक दिली आहे. त्यामुळे मुंबईमध्ये शरद पवारांची राष्ट्रवादी ठाकरेंना साथ देणार का? याची उत्सुकता आहे.

# बार्शीत हडपसर हैद्राबाद रेल्वे एक्सप्रेस आणि ट्रॅक्टरचा अपघात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बार्शी : सोलापुरातील बार्शी तालुक्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. बार्शी तालुक्यात हडपसर-हैद्राबाद रेल्वे एक्सप्रेस आणि ट्रॅक्टरचा अपघात झाला आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार अपघात कोणत्याही प्रकारची जीवीतहानी झाले- ली नाही. मात्र, ट्रॅक्टरचे मोठे नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार हा अपघात किरकोळ असून यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती रेल्वे प्रशासनानं दिली आहे. बार्शी तालुक्यातील खांडवी शेंद्री स्टेशनच्या परिसरात हा अपघ- ात झाल्याची माहिती आहे. रस्त्यावर असलेला फाटक न लावला गेल्यामुळे हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. या अपघातात ट्रॅक्टरचे मात्र मोठे नुकसान झाले आहे.

दरम्यान, गेल्या काही दिवसापासून अनेक ठिकाणी अशा अपघाताच्या घटना घडल्याचे समोर आले आहे. गेल्या १० दिवसापूर्वीच उत्तर प्रदेशातील मिर्जापूर जिल्ह्या- तील चुनार रेल्वे स्टेशनवर मोठा रेल्वे अपघात झाला होता. कालका मेलच्या धडकेत सहा भाविकांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती. रेल्वे पटली क्रॉस करताना या भाविकांचा अपघात झाला होता. ही घटना इतकी भीषण होती की मृतदेहांच्या चिंधड्या उडल्याचं दिसून आलं होतं. सर्व प्रवासी कार्तिक पौर्णिमेसाठी गंगा स्नान करण्यासाठी आले होते. या दुर्घटनेनंतर स्टेशनवर काही काळ गोंधळ माजला होता. रेल्वे पोलिस आणि रेल्वे सुरक्षा बल यांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून मृतदेह हटवले होते. या घटनेने स्थानिक नागरिकांमध्ये आणि प्रवाशांमध्ये प्रचंड संताप पसरला असून, अनेकांनी रेल्वे प्रशासनावर बेजबाबदारपणाचा आरोप केला होता.

## काँग्रेसला ज्येष्ठ नेते पृथ्वीराज बाबांनी आरसा दाखवला!

# ...तर जास्त जागा मिळू शकल्या असत्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बिहार निवडणुकीचे निकाल देशभरात चर्चेचा विषय ठरत असताना काँग्रेसच्या अंतर्गत गोंधळ, चुकीचे अंदाज आणि अपयशी रणनीती यावर माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी थेट बोट ठेवले आहे. पीटीआयशी बोलताना चव्हाण यांनी पक्षाला आरसा दाखवणारे वक्तव्य केले असून, त्यांनी काँग्रेस सल्लागारांच्या निर्णयक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.



मी बिहारला गेलो नाही, पण संपूर्ण राज्यावर भाष्य करणे योग्य ठरणार नाही,असे सांगत त्यांनी काँग्रेसच्या निवडणूक तयारीतील दोष उघडपणे मांडले. त्यांच्या मते, काँग्रेसने स्वतःचे मूल्यमापन न करता चुकीच्या आकड्यांवर आणि चुकीच्या सल्लागारांवर विसंबून संधी दडवली. चव्हाण यांनी स्पष्ट सांगितले की काँग्रेसच्या सल्लागारांनी दिलेले अंदाज वास्तवापासून दूर होते. आपल्याकडे १९ जागा होत्या, त्या २१ किंवा २२ झाल्या असत्या, अगदी १७-१८ झाले असते तरी ठीक, पण निवडक ३० जागा लढल्या असत्या आणि राजदला ४० जागा देण्याची भूमिका घ्यायला हवी होती. त्यांच्या मते, जागावाटपात उदारमतवादी भूमिका घेतली असती तर जास्त जागा मिळू शकल्या असत्या.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, मी संपूर्ण बिहार निवडणूक पाहत आहे, पण मी बिहारला गेलो नाही, त्यामुळे संपूर्ण राज्याबद्दल बोलणे माझ्यासाठी योग्य ठरणार नाही. मी काँग्रेस पक्षाबद्दल काहीतरी सांगू शकतो, तेही, जे मी थोडं पाहिलं आहे. आपण काँग्रेस पक्षाचे आत्मपरीक्षण करत आहोत. जेव्हा जेव्हा विचारांची लढाई असते तेव्हा ती एक-दोन दिवसात संपत नाही. महात्मा गांधींना त्यांचे विचार पोहोचवण्यासाठी, आंबेडकरांना त्यांचे विचार पोहोचवण्यासाठी किती वेळ लागला हे तुम्हाला माहिती आहे. तो काळ देशाच्या इतिहासात एक महत्त्वाचा टप्पा होता. त्यांनी पुढे सांगितले की, विचारांची लढाई खूप वेदनादायक आहे. चढ-उतार असतात. याचे मूल्यांकन करताना, मला कदाचित एकच गोष्ट वाटेल, दूरवरून, काँग्रेस पक्षाचे सल्लागार जे मतांचे आरक्षण करत होते, त्यांनी कदाचित योग्य आकडे दिले नसतील. आपण निवडक ३० जागा घेत उर्वरित ४० जागा राजदला दिल्या असत्या तर एक चांगला संदेश गेला असता आणि कदाचित जागांची संख्या काहींनी वाढली असती. आपण स्वतःचे परीक्षण केले पाहिजे, काँग्रेस काय करत आहे याचे आत्मपरीक्षण केले पाहिजे.



## संपादकीय....

### थंडीची लाट

राज्यात एकीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या निमित्ताने राजकीय वातावरण तापत असताना दुसरीकडे मात्र थंडीचा कडाका देखील जाणवण्यास सुरुवात झाली आहे. रविवारी धुळ्यात ८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. या थंडीचा आनंद घेण्यासाठी नागरिक सकाळीच घराबाहेर पडण्यास सुरुवात झाली आहे. पुढील काही दिवसांमध्ये थंडीचा कडाका अजून वाढणार असल्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. थंडीमुळे जागोजागी शेकोट्या पेटू लागल्या असून उबदार कपड्यांच्या विक्रीत देखील मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. राज्यातील बहुतांश भागात थंडीचा कहर पाहायला मिळत आहे. जवळ जवळ सर्वच जिल्ह्यात किमान तापमानात घट होण्यास सुरुवात झाली असून सर्वत्र थंडीची लाट पसरल्याचे चित्र आहे. दरम्यान पुढील आठवडाभर मुंबई पुण्यासह कोकण, मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात थंडीची हुडहुडी कायम असणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. तर वाढत्या थंडीमुळं ठिकठिकाणी शेकोट्या पेटल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. सोबतच राज्याच्या उत्तरेकडील जिल्ह्यांपासून मराठवाड्यापर्यंत पुढील काही दिवसांत तापमानात लक्षणीय घसरण होईल, असा इशाराही हवामान विभागाने दिला आहे. परभणी शहरासह जिल्ह्यात मागच्या आठवडा भरापासून थंडीची लाट कायम आहे. तापमान हे १० अंशखाली गेल्याने प्रचंड गारठा निर्माण झालाय. हवेमध्ये गारवा असल्याने दिवसभर थंडी कायम राहत आहे. त्यामुळे शाळकरी विद्यार्थी, वृध्द,नागरिकांकडून उबदार कपड्यांचा वापर केला जातोय. तसेच सकाळी ग्रामीण भागातून शहरात येणारे दूध विक्रेते, भाजी विक्रेते यांना या थंडीचा जास्त फटका बसत आहे. थंडीपासून बचावासाठी ग्रामीण भागासह शहरातही शेकोट्या पेटत आहेत. दुसरीकडे रबी पीक ज्यात गहू, हरभरा या साठी ही थंडी पोषक आहे. महाबळेश्वर मिनी काश्मीर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाबळेश्वरमध्ये गेल्या काही दिवसांपासून थंडीमध्ये कमालीची वाढ झाली आहे. आठ दिवसांपासून तापमानात घसरण होऊ लागल्याने थंडीचा कडाका वाढू लागला आहे. दिवसभर कडक ऊन आणि रात्री गारठा वाढू लागला आहे. या कडाक्याच्या थंडीसोबतच गार वारेही वाहूत असल्याने पर्यटनास आलेल्या पर्यटकांसह स्थानिक नागरिक थंडीत गारठले आहेत.महाबळेश्वर शहरामध्ये किमान १०.२अंश सेल्सिअस तापमानाची नोंद होत असून, वेण्णा लेक परिसरात त्याहून तापमानाची कमी नोंद होत आहे..

# लोकमंगलच्या सर्व धर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यात ५२ झोडप्याच्या रेशीमगाठी

## नातेवाईक व मान्यवर भावनिक क्षणाचे बनले साथीदार; राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची उपस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : रविवारी सायंकाळी सूर्यास्ताला जात असताना वातावरणात मंगलध्वनी, ढोल ताशांचा गजर आणि विवाह सोहळ्यांची लगबग पसरली होती. लोकमंगल फाउंडेशन तर्फे आयोजित सर्व धर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यात ५२ झोडपे रेशीम जोडीने व्यासपीठावर दाखल झाली. आणि हजारोंच्या उपस्थितीत त्यांचे मंगल कार्यासाठी रेशीमगाठ बांधल्या गेल्या. ९० आपण त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाची लेके जळकत होती तर सभोवताली उपस्थित असलेले नातेवाईक व मान्यवरही भावनिक क्षणाची साथीदार बनले.

या भव्य सोहळा माजी सहकार मंत्री तथा आमदार सुभाष बापू देशमुख यांच्या पेरणीतून विजापूर रोडवरील शिवाजी अध्यापक विद्यालय (डी .एड. कॉलेज) मैदानावर रविवारी १५ रोजी पार पडला परिसरात पाहुण्यांची गर्दी, रंगीबेरंगी सजावट, सु व्यवस्थित व्यवस्थापन आणि आकर्षक ही मुळे संपूर्ण मैदान प्रोत्साहाचे अन रंगमंच बनले होते. यावेळी आमदार सुभाष बापू देशमुख यांनी यांच्या पत्नी स्मिता देशमुख यांनी कन्यादान केले यावेळी ४९ हिंदू तर तीन बौद्ध विवाह पार पडले.

आमदार देशमुख म्हणाले, दक्षिण तालुक्यातील प्रत्येक गावातील सामुदायिक विवाह सोहळा राबवण्याचा संकल्प व्यक्त केला. व समाजातील




वधू-वरांना आर्थिक व मानसिक आधार देणे, आणि विवाहातील अनाथायी खर्चाला आळा घालने हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.

संपूर्ण दिवस उत्साहामुळे कार्यक्रम सकाळी सर्व वधू वरांसाठी समुपदेशन आयोजित करण्यात आले होते तर आयुष्य कुटुंब व्यवस्थापन आणि आरोग्य विषयक मार्गदर्शन घेऊन दांपत्यांना सक्षम केले गेले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते वधूंना शालू व वरांना सफारी, तसेच रुखवत साहित्याचे वाटप करण्यात आले.

सोहळा स्थळी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. बरोबर वधू वरांसोबत आलेल्या नातेवाईकांसाठी चपाती भाजी आणि बुंदीचे लाडू असे स्वादिष्ट भोजन देण्यात आले होते . पोळ्या बगीतून काढण्यात आलेली वधू-वरांची मिरवणूक हा सोहळ्याचा विशेष आकर्षण ठरली वाजत गाजत सनई चौघड्यांच्या विना दात ही मिरवणूक सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.

**जिल्हा पर्यटन थीमची अनोखी अनुभूती मैदान झाले पर्यटन प्रदर्शन**

यावर्षीचा विवाह सोहळा विशेष ठरला तो जिल्हा पर्यटन थीम मुळे आमदार सुभाष बापू देशमुख यांनी सुरू केलेल्या जिल्हा पर्यटन महोत्सवाच्या धरतीवर या सोहळ्यात पर्यटनाची झलक सादर करण्यात आली होती.

मैदानावर लातूर जिल्ह्यातील ऐतिहासिक ठिकाणचे पॅनल सांस्कृतिक वाराणसी ओळख करून देणारे माहिती फलक विविध गावांच्या विशेष परंपराची मांडणी पर्यटनदृष्ट्या महत्त्वाची स्थळे दर्शवणारे स्टॉल्स आधी विविध माध्यमातून जिल्ह्याची ओळख जिवंत करण्यात आली.

विशेष म्हणजे, अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराजांची मूर्ती स्थळावर प्रदेशात करण्यात आली होती. भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहेहा संदेश उपस्थित यामध्ये श्रद्धा आणि आत्मविश्वास निर्माण करण्यात ठरला.

मान्यवरांची मोठी उपस्थिती सोहळ्यात मिळाली माध्यमिक व सामाजिक दरारा हा विवाह सोहळ्यात धार्मिक सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित लाभली पंढरपूर मंदिर समितीचे अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, आमदार सुभाष बापू देशमुख आमदार विजयकुमार देशमुख बळीराम काका साठे लोकमंगल फाउंडेशनचे अध्यक्ष रोहन देशमुख मनीष देशमुख, पंचाक्षरी शिवाचार्य महास्वामीजी मावळकोवटे अभिनव बसविलिंग महास्वामीजी मणगाव सूर निकंठ शिवशाही महास्वामीजी महाजनसूर सुधाकर महाराज इंगळे महाराज बळीराम जांभळे महाराज, भागवत चौरे महाराज संजय पाटील महाराज, शिरशीकर महाराज यांच्यासह अनेक मान्यवर महाराज मंडळी तसेच आमदार विजयकुमार देशमुख भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर असतील तर तालुक्याचे अध्यक्ष राम जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती यावेळी उपस्थित मान्यवरांची लोक मंगल फाउंडेशनचे अध्यक्ष रोहन देशमुख यांनी सत्कार केला.

सोहळ्याला राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनीही विशेष भेट देऊन नवदांपत्याच्या आशीर्वाद घेतले उपस्थित वधूवरांना त्यांनी मार्गदर्शन करत वैवाहिक जीवनावश्यक परस्पर समजदारपणाचे महत्त्व पटवून दिले आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते राज्यपाल बागडे यांचा सत्कार करून त्यांचे स्वागत करण्यात आले.

# राज्यात 'कुष्ठरोग शोध अभियान' अंतर्गत १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर दरम्यान घरोघरी तपासणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात मागील पाच वर्षांप्रमाणे यंदाही कुष्ठरोग शोध अभियान राबविण्यात येत आहे. १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये व्यापक सर्वेक्षणाद्वारे कुष्ठरोगाचे रुग्ण शोधण्याची मोहीम हाती घेण्यात येणार आहे.

यंदाच्या अभियानात ८.६६ कोटी लोकसंख्या आणि १ कोटी ७३ लाख २५ हजार घरे सर्वेक्षणासाठी निवडली असून, ६५,८३२ पथके आणि १३,१६६ पर्यवेक्षक या मोहिमेसाठी नियुक्त करण्यात आले आहेत. ग्रामीण भागात प्रत्येक पथक दररोज २० घरे, तर शहरी भागात २५ ते ३० घरांना भेट देऊन प्रत्यक्ष शारीरिक तपासणी करणार आहे. प्रत्येक पथकात एक आशा स्वयंसेविका आणि एक पुरुष स्वयंसेवक सहभागी असून, ते सलग १४ दिवस सर्वेक्षण करतील.

कुष्ठरुग्ण शोध अभियानाच्या राज्यस्तरीय जनजागरण समितीची बैठक आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालक डॉ. कादंबरी बलकवडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीला आरोग्य सेवा सहसंचालक (क्षयरोग व कुष्ठरोग) डॉ. राजरत्न वाघमारे, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभागाचे सहायक संचालक डॉ. संजयकुमार जठार, दूरदर्शन प्रतिनिधी डॉ. आलोक खोब्रागडे, आकाशवाणी मुंबईचे राजेश शेजवले, अलर्ट इंडियाचे वरिष्ठ प्रोग्रामर विन्सेंट के. ए., 'अपाल'चे अध्यक्ष माया रणवरे, महाराष्ट्र कुष्ठ पीडित संघटनेच्या सदस्या मदिना शेख, राज्य जागरण समिती सदस्य विकास सावंत या बैठकीला उपस्थित होते. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांना तसेच जिल्हाधिकारी व गावांच्या सरपंचांना पत्र लिहून ही मोहीम यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे. आपल्या जिल्ह्यात कुष्ठरुग्ण शोध अभियानात जास्तीत जास्त कुष्ठरुग्णांचे निदान निश्चितीसाठी सर्व यंत्रणांना मार्गदर्शन करुन आपल्या प्रभावी नेतृत्वाखाली ही मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश अबिटकर यांनी पत्रात केले आहे. आरोग्य विभागाचे मुख्य सचिव डॉ. निपुण विनायक यांनी या अभियानाचा सखोल आढावा घेत सर्व जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारे हे अभियान यशस्वी करण्यासाठी आवाहन केले आहे. राज्यातील नागरिकांनाही सहकार्याचे आवाहन करण्यात आले असून, कुष्ठरोगावरील उपचार पूर्णपणे मोफत, प्रभावी आणि सर्व सरकारी आरोग्य यंत्रणेमार्फत सहज उपलब्ध असल्याची माहितीही आरोग्य विभागाने दिली आहे.

संशयित रुग्णांची वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी करून, कुष्ठरोग निदान झाल्यास त्यांना तत्काळ बहुविध औषधोपचार सुरू करण्यात येणार आहे. घरोघर तपासणी करून समाजातील, निदान न झालेले कुष्ठरुग्ण शोधून उपचाराखाली आणणे व संसर्गाची साखळी खंडित करणे, कुष्ठरोगाबाबत समाजात जनजागृती वाढवणे, २०२७ पर्यंत 'शून्य कुष्ठरोग प्रसार' या ध्येयाच्या दिशेने वाटचाल मजबूत करणे, ही या अभियानाची उद्दिष्ट्ये आहेत. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर सर्वेक्षणाविषयी मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित केली जात आहे. तसेच जिल्हा व तालुका स्तरावर समन्वय समित्या आणि प्रा.आ. केंद्रांवर पथक सदस्यांचे प्रशिक्षण सुद्धा सुरू आहे. राज्यात कुष्ठरोगाचा प्रसार रोखण्यासाठी आणि रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने नुकतेच कुष्ठरोगाला 'नोटिफायबल डिसीज' म्हणून घोषित केले आहे. यानुसार कुष्ठरोगाचे निदान झालेल्या सर्व रुग्णांची नोंद दोन आठवड्यांच्या आत संबंधित जिल्हा आरोग्य कार्यालय, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, कुष्ठरोग तसेच स्थानिक नागरी आरोग्य अधिकाऱ्यांकडे करणे आता सर्व डॉक्टर आणि आरोग्य संस्थांसाठी बंधनकारक आहे.

**राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन**

# आदिवासींच्या जल, जंगल, जमीन आणि संस्कृतीचे रक्षण करू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : राज्य शासन प्रत्येक आदिवासींना वन जमीन पट्टा देत आहे व त्यांच्या संस्कृतीचे रक्षण करीत आहे. आदिवासींच्या कल्याणासाठी राज्य शासन आदिवासी विकास विभागाच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. जनजाती वर्षाच्या निमित्ताने राज्य शासन भगवान बिरसा मुंडा यांनी दिलेल्या शिकवणीनुसार आदिवासींच्या जल, जंगल आणि जमीन व संस्कृतीचे रक्षण करेल, असा विश्वास आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

आदिवासी विकास विभागाच्या वतीने भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त व जनजातीय गौरव वर्षांतर्गत येथील मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुलात राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचे १५ ते १७ नोव्हेंबर २०२५ दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. आज या महोत्सवाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके, विभागाचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव राजेश कुमार, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यंदाचे वर्ष 'जनजातीय वर्ष' म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील आदिवासी जननायकांचे चरित्र जनतेसमोर आणण्याचे तसेच त्यांचे स्मारके उभारण्याचा कार्यक्रम दिला आहे. राज्य शासनानेही राज्यातील आदिवासी नायकांचा गौरवशाली इतिहास पुस्तकरूपाने जनतेसमोर आणला आहे. विविध योजनांद्वारे आदिवासी समाजाचा विकास साधण्यात येत आहे. राज्यातील आदिवासी आश्रम शाळांचा दर्जा सुधारला आहे. आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी 'स्वयम् योजना' राबविण्यात येत आहे. एकही आदिवासी मुलगा शिक्षणापासून वंचित राहू नये. यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. राणी दुर्गावती सक्षमीकरण योजनेद्वारे दीड लाख आदिवासी महिलांना पन्नास हजार ते दीड लाखांपर्यंत मदत करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात आदिवासी समाजाच्या विकासासाठी 'धरती आबा कार्यक्रम' देशभर राबविण्याचे निर्देश दिले आहेत. राज्यात 'धरती आबा कार्यक्रम' राबविण्यासाठी १७मंत्रालयांच्या २५ योजना एकत्र करून ३२ जिल्ह्यातील पाच हजार गावांतील प्रत्येक आदिवासी पाड्यांवर रस्ते, पाणी, वीज, रोजगार आणि महिला विकासाच्या योजना पोहाचविल्या जात आहेत. आश्रम शाळांचे डिजिटायजेशन झाले आहे. ३७ एकलव्य शाळांतील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. आदिवासींच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प करूया - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी




देशाच्या विकासात आदिवासी समाजाचे मोठे योगदान आहे. भगवान बिरसा मुंडा हे या समाजाच्या अभिमान व स्वाभिमानाचे प्रतिक आहेत. निसर्गाच्या सानिध्यात राहून आपली समृद्ध परंपरा जपण्याचे कार्य हा समाज करीत असून त्यांच्या सर्वांगिक विकासाठी संकल्प करण्याचे आवाहन यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. जंगलात राहत असल्याने व शहरी भागापासून दूर असल्याने त्यांच्या विकासासाठी काम होणे गरजेचे आहे. आदिवासींना योग्य संधी मिळण्याची आवश्यकता आहे. म्हणूनच हस्तउद्योग, कुटीर उद्योग आदींच्या माध्यमातून व आदिवासी विकासाच्या विविध योजना केंद्र व राज्य शासनाद्वारे राबविण्यात येत आहेत. आदिवासींच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकासासाठी केंद्र व राज्य शासन प्रयत्नरत आहे. त्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी आर्थिक विकासाचे मॉडेल आखून शासन कार्य करीत असल्याचेही त्यांनी सांगितले.

आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके म्हणाले की, एप्रिल महिन्यापासून भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर आदिवासी विकास विभागाच्यावतीने भगवान बिरसा सांस्कृतिक मंचाची स्थापना केली. याद्वारे ४० हजार युवा-युवतींची नोंदणी व विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. जनजातीय गौरव वर्षांतर्गत करण्यात आलेल्या विविध आयोजनांची त्यांना माहिती दिली. राणी दुर्गावती योजनेच्या माध्यमातून आदिवासी महिला लखपती दीदी होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

**मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाइन भूमिपूजन व लोकार्पण**

सुराबर्डी, नागपूर येथील गोंडवाना आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय तथा आदिवासी संशोधन व प्रशिक्षण उपकेंद्राचे भूमिपूजन, शासकीय आश्रमशाळा, घानवळ, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार, जि. पालघर येथील इमारतीचे लोकार्पण, शासकीय आश्रमशाळा पळसुंडा, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार, जि. पालघर येथील प्रयोगशाळा इमारतीचे लोकार्पण. शासकीय आश्रमशाळा, देवगाव, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक येथील संकुलात मुलींच्या वसतिगृहाचे लोकार्पण मुख्यमंत्री श्री फडणवीस यांच्या हस्ते दूरदृष्यप्रणालीद्वारे करण्यात आले.

आदिवासी विभागाच्यावतीने आयोजित विविध सांस्कृतिक स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरवही त्यांच्या हस्ते करण्यात आला.

तत्पूर्वी, मुख्यमंत्री यांच्या हस्ते 'भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रमय पुस्तका'चे आणि 'आदिवासी परंपरा व सर्जनशिलता' यावर आधारित कॉफीटेबल बुकचे प्रकाशन झाले. आमदार सर्वश्री रविंद्र चव्हाण, डॉ. आशिष देशमुख, माजी केंद्रीय राज्यमंत्री भारती पवार यांचीही यावेळी उपस्थिती होती.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# शालेय जीवनापासून समाज सुधारण्याचे कार्य झाले पाहिजे त्यासाठी पत्रकारांनी योगदान द्यावे : राज्यपाल हरीभाऊ बागडे

## पंढरपूर येथे व्हॉइस ऑफ मीडिया व व्हीओएम नॅशनल फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकारांसाठी कार्यशाळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/जिमाका : समाज सुधारण्याचे कार्य शालेय जीवनापासूनच सुरू झाले पाहिजे आणि या प्रक्रियेत पत्रकारांनी सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन राजस्थानचे राज्यपाल मा. हरीभाऊ बागडे यांनी केले. पंढरपूर येथे व्हॉइस ऑफ मीडिया व व्ही ओ एम नॅशनल फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पत्रकार कार्यशाळेत ते मार्गदर्शन करत होते.

कार्यक्रमास व्हॉईस ऑफ मीडियाचे प्रमुख संदीप काळे, उद्योजक राणा सूर्यवंशी, वरिष्ठ पत्रकार संजय आवटे,इस्कॉन पंढरपूर अध्यक्ष प्रल्हाद प्रभू, श्रीकृष्ण चैतन्य स्वामी महाराज, इस्कॉन सिकंदराबादचे अध्यक्ष सहदेव प्रभू यांच्यासह विविध जिल्ह्यांतील पत्रकार उपस्थित होते.

राज्यपाल बागडे यांनी भारतीय संस्कृतीच्या नैतिक मूल्यांचा गौरव करताना सांगितले की, प्राचीन व मध्ययुगीन इतिहासकार, अभ्यासक आणि परकीय प्रवासी यांच्या लेखनातून भारतीय संस्कृती समृद्ध आणि नैतिक मूल्यांनी युक्त होती. इंग्रजांनी १८३५ मध्ये गुलामगिरी निर्माण करणारी शैक्षणिक पद्धती आणून या मूल्यांवर घाला घातला. मात्र, २०२० पासून केंद्र शासनाने शैक्षणिक धोरणात अमूलाग्र बदल करून नवसंस्कारित दिशा दिली आहे.

पत्रकारांच्या भूमिकेवर प्रकाश टाकताना त्यांनी नारद मुनी यांचा उल्लेख 'पहिले पत्रकार' म्हणून केला आणि सांगितले की, राष्ट्र, राज्य, शहर आणि गावाच्या विकासात पत्रकारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विकासात्मक दृष्टिकोन ठेवून पत्रकारांनी काम केल्यास समाजात सकारात्मक बदल घडतो.

राज्यपालांनी प्रसारमाध्यम क्षेत्रातील विविध उदाहरणांचा दाखला देत पत्रकार समाज सुधारण्याच्या कार्यात कशी महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात याचे विवेचन केले. त्यांनी नालंदा विद्यापीठाच्या आयुर्वेद शाखेचे उदाहरण देत प्राचीन भारतातील संशोधन वृत्ती आणि शिक्षणपद्धतीचे महत्त्व अधोरेखित केले. इंग्रजांच्या काळात गव्हर्नर मेकॉले यांच्या शैक्षणिक धोरणामुळे भारतीय मूल्यांवर परिणाम झाला, असेही त्यांनी नमूद केले.

पत्रकार समाजाचा आरसा असून, जनतेचे मत आणि गरजा राजकर्त्यांपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वाचे कार्य ते करतात, असे सांगून त्यांनी व्हॉईस ऑफ मीडिया संस्थेच्या कार्याचे कौतुक केले.

कार्यक्रमात राज्यभरातील विविध जिल्ह्यांतील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान मा. राज्यपालांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक अनिल मस्के यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात व समारोपही राष्ट्रगीताने करण्यात आला.



# भारतीय बौद्ध महासभा अक्कलकोटच्या वतीने समता सैनिक दलाचे एक दिवसीय प्रशिक्षण शिबिर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी :तथागत भगवान गौतम बुद्ध,बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब वाघमारे तालुकाध्यक्ष साहिल कांबळे,किरण साबळे जिल्हा उपाध्यक्ष,संगीताताई भंडारे ,हसापूर गावचे पोलीस पाटील डिगंबर सोनकांबळे, उपसरपंच गौतम घटकांबळे,ग्रा. सदस्य मारुती घटकांबळे,जयंती उत्सव अध्यक्ष लक्ष्मण घटकांबळे,कमल थोरे,वैशाली खंडाळे आदी सह प्रमुख व्यक्तीच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले

या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब वाघमारे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले




विश्वरत्न बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेले समता सैनिक दल आपणास प्रत्येक खेडेगावात पोचवणे आपले आद्य कर्तव्य आहे यासाठीच अक्कलकोट तालुक्याच्या वतीने हा शिबिर घेण्यात आलेला आहे येणाऱ्या काळात अक्कलकोट तालुक्यात १००० सैनिक निर्माण करू असे मनोगत कार्यक्रमाचे अध्यक्ष बौद्धाचार्य साहिल कांबळे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी अन्नदानात आंबेडकरी ज्येष्ठ नेते मार्गदर्शक बाबुराव बनसोडे, गोगावचे उपसरपंच कमलाकर सोनकांबळे,युवा नेते प्रशिक दादा बनसोडे, सहकारी आणि मार्गदर्शक खाजप्पा दादानवरू,दत्ता बनसोडे यांचे विशेष सहकार्य लाभले तसेच या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक म्हणून लेफ्टनंट कर्नल जिल्ह्याचे उपाध्यक्ष किरण साबळे डिव्हिजन ऑफिसर संगीताताई भंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण देण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी दत्तात्रय सिद्धगणेश,बाबू रणखांबे,प्रताप वाघमारे ,सुनील घटकांबळे ,हसापुर तरुण मंडळ अध्यक्ष गौतम घटकांबळे,उपाध्यक्ष सुशील आदीसह सोलापूर व अक्कलकोट तालुका भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी धम्म उपासक उपासिका तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दर्शन गायकवाड यांनी केले.

# जागतिक बँकेचा पैसा महिलांमध्ये वाटला; बिहार निवडणुकीनंतर प्रशांत किशोरांच्या जन सूरजचा एनडीएवर गंभीर आरोप





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पाटणा : बिहार विधानसभा निवडणुकीनंतर एक नवीन राजकीय वाद निर्माण झाला आहे. राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांच्या जन सूरज पक्षाने एनडीए सरकारवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. मतदानापूर्वी महिलांच्या खात्यात हस्तांतरित केलेले दहा हजार रुपये जागतिक बँकेच्या निधीतून दुसऱ्या प्रकल्पासाठी वळवले गेले होते. जन सूरजचे प्रवक्ते पवन वर्मा यांनी म्हटलं आहे की, निवडणूक आचारसंहिता लागू होण्याच्या काही काळापूर्वीच हे पैसे खात्यात हस्तांतरित करण्यात आले होते, ज्यामुळे निवडणुकीच्या वातावरणावर मोठा परिणाम झाला.

वर्मा म्हणाले की, ही रक्कम सुमारे एक तास आधी हस्तांतरित करण्यात आली होती आणि अनेक विश्वसनीय सूत्रांनी त्यांना याची माहिती दिली होती. ते म्हणाले की, केलेल्या आरोपांमध्ये स्पष्टता नाही, पण तथ्य आढळल्यास संपूर्ण निवडणुकीवर नैतिक प्रश्न उपस्थित करेल. दहा हजार रुपयांची योजना १.२५ कोटी महिला मतदारांपर्यंत पोहोचली आणि निवडणुकीदरम्यान सर्व पक्षांना त्याचा राजकीय परिणाम जाणवत होता.

पवन वर्मा यांनी असेही म्हटले आहे की राज्याचे कर्ज वेगाने चार लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाले आहे आणि दररोज मोठ्या प्रमाणात व्याज द्यावे लागत आहे. त्यांनी सांगितले की, सरकारचा तिजोरी रिकामी आहे, त्यामुळे निवडणुकीपूर्वी एवढी मोठी रक्कम हस्तांतरित करण्यासाठी बाह्य निधीची आवश्यकता निर्माण झाली आहे. जर एनडीए (पान ४ वर..)

# भादा जिल्हा परिषद गटातून कॉंग्रेस पक्षाच्या वतीने संगीता ज्ञानोबा गोडभरले यांच्या नावाला मतदारातून पहिली पसंती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव :

भादा जिल्हा परीषद गटातील जनता आपल दैवत मानुन जनसेवा करणार ओबीसी चेहरा सौ,संगीता ज्ञानोबा गोडभरले ,,,,

औसा तालुक्यातील भादा जिल्हा परिषद गटातुन ओबीसी प्रवर्गातुन कॉंग्रेस पक्षाच्या वतिने निवडणुक लढण्यासाठी ओबीसी चेहरा सौ. संगीता ज्ञानोबा गोडभरले या सक्षम महिला उमेदवार असुन राजकारणाचा प्रदिर्घ अनुभव असलेले सरपंच ज्ञानोबा बळीराम गोडभरले यांनी लखनगाव गावचा चेहरा मोहरा बदलला असुन कॉग्रेस पक्षाशी एकनिष्ठता दाखउन गेल्या तीस वर्षापासुन ८० टक्के समाजकारण तर २० टक्के राजकारण करत भादा जिल्हा परिषद गटातील प्रत्येक गावात त्यांचा असलेला दांडगा जनसंपर्क पाहता भादा जिल्हा परिषद गटातून संगीता ज्ञानोबा गोडभरले यांनी कॉंग्रेस पक्षाकडून निवडणूक लढवावी असे सर्वसामान्य लोकातून बोलले जाते. ज्ञानोबा गोडभरले यांनी आपल्या तीस वर्षाच्या सक्रीय राजकीय कार्यकाळात लखनगाव ग्रामपंचायतचे सरपंच ,उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य असे अनेक पद भुषवित सरपंच उपसरपंच कार्यकाळात अनेक लोकोपयोगी कामे करत सर्वसामान्यांचे नेतृत्व करणारा हक्काचा माणूस म्हणून काम केला आहे,,, गेल्या अनेक वर्षापासून रखडलेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या सदस्य पदासाठी निवडणूक जाहीर होताच औसा तालुक्यातील भादा जिल्हा परिषद गट हा ओबीसी महिलेसाठी आरक्षित झाला असून या भादा गटातून संगीता गोडबोले या कॉंग्रेस पक्षाकडून निवडणूक लढण्यासाठी आग्रही आहेत सहकार महर्षी दिलीपराजी देशमुख साहेबांच्या अत्यंत जवळचे ,आमदार अमित भैया देशमुख यांच्या मर्जीतले ,मा. आमदार तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धीरज भैया देशमुख यांच्या मनातले कार्यकर्ते म्हणून ज्ञानोबा गोडभरले यांची ओळख आहे, तर भादा जिल्हा परिषद गटातील लखनगाव या गावचे रहिवासी असलेले ज्ञानोबा बळीराम गोडबोले यांच्या सुविद्य पत्नी सौ संगीता ज्ञानोबा गोडभरले यांना जिल्हा परिषद भादा गटातून उमेदवारी मिळावी अशी जनतेतून एकमुखी मागणी होत आहे, गेली दहा वर्ष लखनगाव ग्रामपंचायत मध्ये सदस्य असणाऱ्या संगीता गोडबोले व त्यांचे पती ज्ञानोबा गोड भरले यांना जिल्हा परिषद गट मतदार संघाची संपूर्ण माहिती असून प्रत्यक्षरीत्या ते सर्व मतदारांना ओळखतात व व भादा गटातील लोकांशी असलेलं प्रेमाचं व जिव्हाळ्याचं नातं त्यामुळे त्यांचा भादा गटात दांडगा जनसंपर्क असल्याचं



बघायला मिळतं, कॉंग्रेसचे कार्यकर्ते तथा लखनगावचे सरपंच ज्ञानोबा बळीराम गोडभरले हे लखनगाव ग्रामपंचायत मध्ये दहा वर्षे सरपंच पाच वर्षे उपसरपंच व पाच वर्ष सदस्य म्हणून त्यांनी काम केलं आहे जनसामान्यात स्वच्छ प्रतिमा प्रशासनाची जाण तळागाळातील नागरिकांच्या प्रश्नांची जाण ,असणारे व सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी ज्ञानोबा गोडभरले यांची नेहमीच तळमळ असते.

संगीतात ज्ञानोबा गोडभरले यांनी आपल्या दहा वर्ष ग्रामपंचायत सदस्य कार्यकर्ते महिलांची एकजूट करून महिला सक्षमीकरण करत त्यांनी सतत कॉंग्रेस पक्षासाठी काम केलेला आहे ,बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे अनेक प्रश्न सोडवण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात संगीता गोडभरले या स्थानिक उमेदवार असताना त्यांच्या नावाला मतदारसंघातुन पसंती पहिली पसंती येत असून कॉंग्रेस पक्षही त्यांच्या आजवरच्या कामाची पावती म्हणून भादा जिल्हा परिषद गटातून त्यांना उमेदवारी पक्ष देईल अशी भादा गटातील लोकांची अपेक्षा आहे ,कॉग्रेस पक्षाने बाहेरचा उमेदवार लादु नये अशी ही विनंती मतदार संघातील लोकांच्या चर्चेतून होताना दिसून येत आहे.

ज्ञानोबा बळीराम गोडभरले यांनी गेल्या वीस वर्षात ग्राम पंचायतच्या माध्यमातून लखनगाव गावात गावातील अंतर्गत सिमेंट रस्ते व पेव्हर ब्लॉक रस्ते ,लोकांच्या आरोग्यासाठी फिल्टर युक्त पाणी गावच्या लोकांना दील असुन.सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख व ग्रामिण चे आमदार धिरज देशमुख यांच्या निधीतुन व विवीध योजनेतुन ग्रामपंचायतच्या माध्यमातून, सुसज्य ग्राम पंचायत ईमारत उभारणी केली असुन जिल्हा परिषद शाळेचा सर्वांगीण विकास, गावचा पाणी प्रश्न कायमचा मीटावा यासाठी लखनगाव पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करून गावातील पाणी प्रश्न कायमचा मीटवला असुन कोरोना काळात निराधारणा आधार देण्यासाठी निराधारांच्या पगारी घरपोच देण्याची सेवा ज्ञानोबा गोडभरले यांनी केली आहे, ज्ञानोबा घोडबले यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधत असताना मी माझ्या लखनगाव गावच्या विकासात कुठेही कमी पडलो नाही तर येणाऱ्या काळात मला भादा जिल्हा परिषद गटातील लोकांची सेवा करण्याची तीव्र इच्छा असून मला कॉंग्रेस पक्षाने जिल्हा परिषद लढवण्यासाठी ताकद द्यावी व मी माझा भादा मतदार संघातील लोकांची सेवा करण्याची संधी मीळावी अशी एक जनतेचा सेवक मनुन जनसेवा करण्या माझा संकल्प असल्याच ज्ञानोबा गोडभरले यांनी सांगीतले

**निवडणुकिची तयारी पाहून केले समाधान व्यक्त**

**सुरक्षाविषयक महत्वाच्या तयारीविषयी दिल्या सूचना**

# नगर परिषद निवडणुकीच्या निमित्ताने मा. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांची सिंदखेडराजाला भेट




आज नगरसेवक पदासाठी एकूण ५७ अर्ज प्राप्त झाले आहेत, मागील सहा दिवसांचे एकूण ४ अर्ज आले होते दोन्ही मिळून एकूण ६१ अर्ज प्राप्त झाले आहेत .

- शिवसेना (शिंदे) –१९
- शिवसेना (उबाठा) – २
- राष्ट्रवादी (अ प) – १०
- राष्ट्रवादी (श प) – १५
- अपक्ष – १२
- भाजप – ३

नगराध्यक्ष पदासाठी आज एकूण ३ अर्ज प्राप्त झाले आहेत .

- वंचीत – एक
- शिवसेना (शिंदे) – एक
- अपक्ष – एक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : मा.राज्य निवडणूक आयोगाने नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता निवडणूक कार्यक्रम घोषित केलेला असून दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. सदर निवडणुकीच्या अनुषंगाने दिनांक १० नोव्हेंबर २०२५ पासून उमेदवारांचे नामनिर्देशन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु आहे, आज दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. डॉ. किरण पाटील साहेब यांनी नगर परिषद सिंदखेडराजाला भेट दिली.

आजच्या बैठकीमध्ये मा. डॉ. पाटील साहेबांनी अधिकाऱ्यांना नाम निर्देशन अर्जाबाबत मार्गदर्शन करून नगर परिषद निवडणुक योग्य प्रकारे पार पाडावी असे सांगितले. मागील विधानसभा निवडणुकीमध्ये मध्ये सर्व अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांनी उत्तम प्रकारे काम केले असेच काम आत्ता नगर परिषद निवडणूक २०२५ मध्ये सर्वानी करावयाचे आहे असे मा. पाटील साहेबांनी सांगितले.

डॉ. किरण पाटील साहेब यांनी आजच्या पाहणी दौऱ्यामध्ये सिंदखेड राजा नगर परिषद निवडणुकीसाठी केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी भेट दिली. सदर भेटीमध्ये ईव्हीएम सुरक्षा कक्ष पाहण्यात आला, सुरक्षा कक्षामध्ये सीसीटीव्ही कॅमेरा व्यवस्था तसेच इतर सुरक्षाविषयक महत्वाच्या तयारीविषयी सूचना दिल्या. सोबतच डॉ. पाटील साहेबांनी मतमोजणी केंद्राची सुद्धा पाहणी केली, मतमोजणी केंद्रामधील व्यवस्था, सुरक्षा तसेच इतर सर्व पायाभूत सुविधांची पाहणी करून समाधान व्यक्त केली. नगरपरिषद निवडणुकीसाठी अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठीचे ठिकानाची सुद्धा पाहणी केली, प्रशिक्षण सर्व अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांना देण्यात यावे याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. निवडणुकीच्या अनुषंगाने फिरते पथक, स्थिर पथक यांची संख्या सद्यस्थितीमध्ये पुरेशी आहे, महत्वाच्या ठिकाणी चेक पोस्ट सक्रिय आहे इत्यादी विषयाचा आढावा घेण्यात आला.

मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री.डॉ. किरण पाटील यांनी नगर परिषद सिंदखेडराजा येथील नामनिर्देशन अर्ज भरणाऱ्या कक्षाला भेट दिली, नामनिर्देशन अर्ज भरतेवेळी काही अडचणी येत आहेत का तसेच नामनिर्देशन प्रक्रियेसाठी काही महत्वाच्या सूचना निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे यांना केल्या. तसेच प्रा. खडसे यांच्या निवडणूक तयारीबद्दल केलेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले.

आजच्या या पाहणीवेळी मा.उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, मा. निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे, मा. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. आशिष बोबडे , मा. नायब तहसीलदार डॉ. प्रवीणकुमार वराडे, नायब तहसीलदार नितीन बढे, पोलीस निरीक्षक आशिष इंगळे, प्रसार माध्यम नोडल अधिकारी प्रकाश शिंदे तसेच इतर सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# पंढरपूर नगरपरिषदेसाठी सातव्या दिवशी ७८ अर्ज दाखल

## नगराध्यक्षपदासाठी प्रणिता भालके यांचा अर्ज दाखल; भाजपच्या उमेदवाराकडे लागले लक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर नगरपरिषदेसाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या सातव्या दिवशी ७४ नगरसेवकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. तर नगराध्यक्षपदासाठी ४ उमेदवारी अर्ज दाखल झालेले आहेत. नगराध्यक्ष पदासाठी प्रणिता भगीरथ भालके यांनी तीर्थक्षेत्र विकास आघाडीकडून नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे भाजपकडून कोणाचा नगराध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला जातो, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

दि. १६ नोव्हेंबर रोजी निहाल दिलीप चौगुले प्रभाग क्र. १०-ब, मुकुंद मोहन उत्पात प्रभाग क्र. ५-ब, लखन मधुकर चौगुले प्रभाग क्र. १-अ, नागेश प्रकाश पवार, प्रभाग क्र. ११-ब, मनजीत नंदकुमार कदम प्रभाग क्र. ७-ब, लखन मधुकर

**नगराध्यक्षपदासाठी जैतुनबी अबदुलरौफ मुलाणी, प्रणिता भगिरथ भालके, प्रणिता भगिरथ भालके, कांचन तुळजाराम बंदपट्टे असे एकूण ४ नामनिर्देशनपत्र दाखल झाले आहेत.**

चौगुले प्रभाग क्र. १-अ, नितीन अर्जुन पुणेकर प्रभाग क्र. ५-ब, शहाजी देविदास शिंदे प्रभाग क्र. ३-ब, ,महमंद हुसेन अब्दुलहक उस्ताद प्रभाग क्र. ९-ब, विजय परमेश्वर वरपे प्रभाग क्र. १४-ब, युवराज शरणप्पा मुचलंबे प्रभाग क्र. २-अ, राजसिंह सत्यवान डुबल प्रभाग क्र. १२-ब, किर्तीपाल सुनिल सर्वगोड प्रभाग क्र. ६-अ, सुनिल दिगंबर सर्वगोड प्रभाग क्र. ६-अ, शुकुर अहमद हिरालाल बागवान, प्रभाग क्र. १८-अ, अंबालाल किसन दोडिया प्रभाग क्र. १७-अ, संजय जवाहरलाल बंदपट्टे प्रभाग क्र. १०-ब, अमोल सुरेश घोडके प्रभाग क्र. १७-अ, श्रीकृष्ण महादेव परचंडराव, प्रभाग क्र. ९-ब, प्रशांत भिमाशंकर घोडके, प्रभाग क्र. २ अ, अमर वसंत सुर्यवंशी प्रभाग क्र. १२ ब, ज्ञानराज सिताराम सर्वगोड, प्रभाग क्र. ६-अ, अंबादास बाबुराव धोत्रे प्रभाग क्र. २-अ, काशिलिंग पांडुरंग डोईफोडे प्रभाग क्र. १८-अ, धनंजय मोहन मोरे प्रभाग क्र. ८-ब, सतीश धर्मा शिंदे प्रभाग क्र. ११-ब, सतीश धर्मा शिंदे प्रभाग क्र. ११-ब, शंकर एकनाथ चौगुले प्रभाग क्र. १-अ, विनायक बसवेश्वर देवमारे प्रभाग क्र. १८-अ, प्रदिप उमेश परचंडे प्रभाग क्र. ९-ब, प्रदिप उमेश परचंडे प्रभाग क्र. ९-ब, वैभव ज्ञानेश्वर फसलकर प्रभाग क्र. ३-ब, प्रशांत शिवाजी मलपे प्रभाग क्र. ११-ब, महादेव माणिक धोत्रे प्रभाग क्र. १४-ब, महादेव माणिक धोत्रे प्रभाग क्र. १४-ब, ज्ञानराज सिताराम सर्वगोड प्रभाग क्र. १७-अ, प्रज्योत अशोक भोसले प्रभाग क्र. ७-ब, वैभव ज्ञानेश्वर फसलकर प्रभाग क्र. ३-ब, रणजित अरुण पाटील प्रभाग क्र. ९-ब, राजाभाऊ गोविंद डोके प्रभाग क्र. १६-अ, ज्ञानेश धनंजय बागडे प्रभाग क्र. ७-ब, किशोर महादेव खिलारे प्रभाग क्र. १७-अ, प्रसाद प्रकाश कळसे प्रभाग क्र. २-अ, संतोष

**आज सोमवार उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी भाजपचे नगराध्यक्ष व नगरसेवक पदाचे उमेदवार अर्ज दाखल करणार आहेत. तर विरोधक विठ्ठल परिवाराकडून देखील उमेदवारी अर्ज दाखल होतील. नगराध्यक्षपदासाठी कोण कोण उमेदवारी अर्ज दाखल करतात, याच्याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. भाजपकडून शामल शिरसट, वाळूजकर की साधना भोसले यांचे नाव नगराध्यक्षपदासाठी पुढे येते हे अर्ज भरल्यानंतरच स्पष्ट होणार आहे. तर विठ्ठल परिवारातील अभिजीत पाटील, अनिल सावंत यांचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार कोण असणार? याकडेही लक्ष लागले आहे.**

गोरख धोत्रे प्रभाग क्र. १-अ, शिवाजी ज्ञानेश्वर मस्के प्रभाग क्र. १६-अ, शिवाजी ज्ञानेश्वर मस्के प्रभाग क्र. १६-अ, श्रीनिवास राजाराम उपळकर प्रभाग क्र. ३-ब, अनिता राजेंद्र पवार प्रभाग क्र. ११-ब, माधुरी दिलीप धोत्रे प्रभाग क्र. १७-ब, कुसुम रमेश गायकवाड, प्रभाग क्र. १७-ब, वैशाली प्रकाश लोखंडे प्रभाग क्र. ११-अ, निता विजय वाघ प्रभाग क्र. २-ब, निता विजय वाघ प्रभाग क्र. २-ब, आरती सागर चव्हाण प्रभाग क्र. १७-ब, वर्षा पांडुरंग चौधरी प्रभाग क्र. ८-अ, सुरेखा भारत धोत्रे प्रभाग क्र. १-ब, शितल प्रितम कुलकर्णी प्रभाग क्र. १५-ब, पल्लवी संजय बंदपट्टे प्रभाग क्र. १०-अ, निलोफर राऊफ बागवान प्रभाग क्र. ६-ब, उमा संजय घोडके प्रभाग क्र. १७-ब, उमा संजय घोडके प्रभाग क्र. १७-ब, वैशाली संतोष बंडगर प्रभाग क्र. ८-अ, अर्चना काशिलिंग डोईफोडे प्रभाग क्र. १८-ब, सुरेखा पांडुरंग शिंदे प्रभाग क्र. १-ब, सुरेखा पांडुरंग शिंदे प्रभाग क्र. १-ब, लक्ष्मी आण्णासाहेब पवार प्रभाग क्र. १६-ब, लक्ष्मी आण्णासाहेब पवार प्रभाग क्र. १६-ब, प्रज्ञा पृथ्वीराज भोसले प्रभाग क्र. १-ब, अदिती अमित डोंगे प्रभाग क्र. २-ब, अदिती अमित डोंबे प्रभाग क्र. २-ब, ऋतुजा श्रीनिवास उपळकर प्रभाग क्र. ३-अ, वीणा सागर यादव प्रभाग क्र. २-ब, मंदा शिवाजी धोत्रे १-ब असे ७४ नामनिर्देशन पत्र दाखल झाले आहेत.

## कठोर मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर कुठलेही शिखर गाठता येते : आयपीएस बिरुदेव डोणे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कोणत्याही क्षेत्रामध्ये काम करताना अनंत अडचणी येत असतात. आपण जे क्षेत्र निवडले आहे त्यामध्ये प्रामाणिकपणे आपण काम केले पाहिजे. कारण कठोर मेहनत चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर आपण ठरलेले कुठलेही शिखर आपण सहज गाठू शकतो असे प्रतिपादन आयपीएस अधिकारी विरुद्ध डोणे यांनी केले.

ते मंगळवेढा येथील स्वर्गीय बी.टी. पाटील यांच्या निवासस्थानी भेट दिल्यानंतर बोलत होते त्यावेळी पाटील परिवाराच्या वतीने डोणे यांचा सत्कार करण्यात आला.

पुढे बोलताना ढोणे म्हणाले की, प्रयत्नाची पराकाष्टा केली तर संधीचे सोने करता येते आणि आपण मनोमन आखलेले यश प्राप्त करू शकतो कारण माझे बालपण अत्यंत हलकीच्या परिस्थितीत गेले. आमच्या घरी वीज नव्हती, अभ्यासासाठी शाळेच्या वर अंड्याचा आसरा होता, वडील मेंढपाळ, आई ग्रहणी अशा पार्श्वभूमीतून आलेल्या या माझ्यासारख्या युवकाला शिक्षण घेताना अनेक अडथळे आले पण मी कधीही हार मानली नाही कारण प्रचंड इच्छाशक्ती घेऊन मी या ध्येय प्राप्तीसाठी अहोरात्र मेहनत घेत होतो आणि माझी हीच मेहनत माझ्या कामी आली व ग्रामीण भागातील मुलांनी युद्ध मोबाईलच्या आहारी न जाता आपल्या आई-वडिलांचे कष्ट डोळ्यासमोर ठेवून आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कठोर मेहनत व परिश्रम केले पाहिजेत असे शेवटी डोणे यांनी सांगितले.

यावेळी सीतामापा ढोणे, वित्त व लेखाधिकारी अजित शिंदे, जयदीप रत्नपारखी, प्रभाकर घुले, सुनील पाटील, प्राध्यापक सतीश पाटील दिलीप पाटील प्रबोध बेनवडे समाधान फुगारे विलास मासाळ उपस्थित होते. ग्रामीण भागातील मुलांना सांगण्याचा उद्देश हाच आहे की स्वतःवर कितीही वाईट परिस्थिती आली तरीही तुमच्याकडे जिद्द चिकाटी आणि समर्पणाची भावना असेल तर तुम्ही तुमच्या परिस्थितीवर मात करून चांगली नोकरी मिळवू शकता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा एक कोट आहे तुम्ही गरीबी जन्माला या तुमच्या दोषी नाही पण गरिबीत मेलात हा तुमचा खरा दोष आहे प्रयत्नाची परा कष्टा केली तर संधीचे सोने करून यश प्राप्त करू शकता माझ्यासारख्या मेंढपाळाचा मुलगा हे सर्व करू शकतो तरी तुम्ही करू शकता गावाकडच्या मुलांनी कोणत्याही गोष्टीला घाबरून न जाता आपले प्रयत्न आणि चिकाटी ठेवली तर सगळ्या गोष्टी साध्य करणे सोपे आहे. असाही संदेश विरुद्ध डोणे यांनी दिले.

## 'ऑपरेशन पहाट' उपक्रमांतर्गत करमाळा पोलीस स्टेशन हद्दीतील गरीब पारधी समाजातील लोकांना आत्मनिर्भर जीवन जगण्यासाठी सात गायींचे वाटप





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून ऑपरेशन पहाटया उपक्रमांतर्गत करमाळा पोलीस स्टेशन हद्दीतील गरीब पारधी समाजातील सात गायींचे वाटप करण्यात पोलीस अधीक्षक रणजीत माने साहेब यांच्या उपस्थितीत १४ नोव्हेंबररोजी श्री अतुल कुलकर्णी सात महिला व पुरुष यांना पोलीस अधीक्षक सो यांनी आत्मनिर्भर जेवण जगण्यासाठी समाजातील मदत करणाऱ्यांना संबंध यांच्याकडून सात गायी उपलब्ध करून दिले आहेत. सदरच्या गाई वाटप करण्याच्या आल्या आहेत आदरणीय पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी सर, अप्पर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम यावलकर सर,सहाय्यक पोलीस अधीक्षक श्रीमती अंजना कृष्णा व्हीएस मॅडम व पोलीस निरीक्षक रंजीत माने यांच्या मार्गदर्शनाखाली समाजातील विविध घटकातील लोकांना गुन्हेगार क्षेत्रातून बाहेर काढून मूळ प्रवाहात आणण्यासाठी ऑपरेशन पहाट अंतर्गत शिलाई मशीन, कुटीर उद्योगांना शासनाच्या विविध योजनेचा लाभ मिळवून देण्यात येणार आहे. वरील गोधन वाटप हे मराठा असोसिएशन पुणे यांच्यामार्फत केलेले आहे.

## प्रभाग क्रमांक २ मधुन मारुती खारवे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग नगर परिषद सार्वत्रिक निवडणूकीत प्रभाग क्रमांक २ मधुन सामाजिक कार्यकर्ते मारुती खारवे यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

नळदुर्ग नगर परिषद प्रभाग निहाय होऊ घातलेल्या अनुसुचित जाती नगरसेवक पदासाठी प्रभाग क्रमांक २ मधुन सामाजिक कार्यकर्ते तथा डॉ आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लिश मिडीयम स्कुलचे मुख्य प्रवर्तक संस्थापक मारुती सुदाम खारवे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

मारुती खारवे हे नळदुर्ग शहरात अनेक विधायक कार्यक्रम राबवून समता बंधुता आणि न्याय मिळवून देण्यासाठी ते आग्रेसर आसतात त्यांनी नळदुर्ग शहरात नविनच शिक्षण समूह निर्माण करून नळदुर्ग येथील विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेत चांगले व दर्जेदार शिक्षण देण्याचे खुप मोठे कार्य दिले आहेत सलग ६ वेळेस डॉ आंबेडकर इंग्लिश मिडीयम स्कूलचे विद्यार्थी नळदुर्ग केंद्रा सर्कल मध्ये प्रथम ,द्वितिय आणि तृतीय येण्याचा मान मिळविला आहे.



डॉ. आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लिश मिडीयम स्कुल काढून विद्यार्थ्यांना संजिवनी मिळाली आहे.

सामाजिक कार्य आसो, सर्वांच्या सुखास दुःखात सहभागी होऊन ते कार्य पुर्ण करतात त्यांचा सामाजिक व शैक्षणिक कार्याशी नाळ जुळलेली आहे . त्यांच्या सुविध पत्नी लक्ष्मी मारुती खारवे ह्या नळदुर्ग नगर परिषदेच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्या नंतर त्यांनी वार्डात अनेक योजना व विकास कामे राबविली आहेत ते सतत संविधानाच्या चौकटीत राहून नियमावर बोट ठेवत

ते निखळ काम करतात ते रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया नळदुर्ग शहराध्यक्ष म्हणून अनेक वर्ष झाली काम पाहातात या सर्व कार्यशी सर्वच नळदुर्ग करांना चांगलीच ओळख आहे.

मारुती खारवे हे प्रभाग क्रमांक २ मधुन अनुसुचित जाती नगर सेवक पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे उदा दि १७ नोहेंबर अर्ज दाखल करण्याची शेवट तारीख आहे.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी नळदुर्ग तहसिलचे अप्पर तहसिलदार प्रमोद गायकवाड, नगर परिषदेचे मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर, नायब तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी घृणेश्वर स्वामी हे काम पाहात आहेत.

अर्ज दाखल करताना स्वतः उमेदवार मारुती खारवे, रिपाइंचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, सचिव एस के गायकवाड, तुळजापूर तालुका अध्यक्ष अरुण लोखंडे, जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब मस्के, शिवसेना उठाबाचे नेते सरदारसिंग ठाकुर, शहर प्रमुख संतोष पुदाले, रिपाइंचे नेते राजेंद्र शिंदे, महादेव कांबळे अरविंद लोखडे, भैय्या रणे आदिजन उपस्थित होते.

### शिवछत्रपती रंगभवन मध्ये मसाप दक्षिण शाखेकडून आयोजन

# पद्मश्री ॲड.उज्वल निकम यांची १९ नोव्हेंबर रोजी प्रकट मुलाखत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीयस्तरावर गाजलेल्या विविध खटल्याचे विशेष सरकारी वकील पद्मश्री उज्वल निकम यांची प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने बुधवार दि. १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.२५ वाजता श्री शिवछत्रपती रंगभवन मध्ये आयोजन करण्यात आल्याची माहिती अध्यक्षा रेणुका महागांवकर, कार्याध्यक्ष प्रशांत बडवे यांनी दिली.

माझा जीवन प्रवास जळगाव ते दिल्ली व्हाया मुंबई या अंतर्गत पद्मश्री खासदार ॲड उज्वल निकम यांची मुलाखत होणार असून माधव देशपांडे हे मुलाखत घेणार आहेत. जळगावचे सुपुत्र असलेले ॲड उज्वल निकम यांनी सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथील पोलीस शिपाई धुळा कोळेकर या गाजलेल्या खटल्यात विशेष सरकारी वकील म्हणून मोठी जबाबदारी पार पाडली होती. त्याचबरोबर त्यांनी मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याच्या खटल्यात तसेच राज्यातील आणि देशातील विविध खटल्यात सरकारची बाजू त्यांनी योग्य प्रकारे मांडून पिडीतांना न्याय देण्याचा प्रयत्न केल्याने भारत सरकारकडून त्यांना पद्मश्री या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सध्या ते राज्यसभेचे सदस्य असून खासदार म्हणून त्यांनी नुकतेच कामकाज सुरू केले आहे. अशा या देशभक्ताचा जीवनप्रवास कसा आहे याचा उलगडा होवून आजच्या पिढीला मार्गर्शक ठरणार आहे.



महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या माध्यमातून समाजप्रबोधन आणि जनजागृतीसाठी अनेक उपक्रम राबवण्यात येतात दरवर्षी दिपावलीच्या निमित्ताने ज्येष्ठ निरूपणकार विवेकजी घळसासी यांची प्रवचनमाला, महाराष्ट्राचे प्रतिभावंत साहित्यिक कवी विंदा करंदीकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांच्या कथा, कवितांवर आधारीत विंदा एक स्मरणसाखळी हा बहारदार कार्यक्रम तसेच महाराष्ट्राचे सुपुत्र असलेले आणि दुबईत मसाला किंग म्हणून ओळख निर्माण करणारे धनंजय दातार यांच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम सोलापूरातील उद्योजकांना मार्गदर्शक ठरला. मसाप दक्षिण शाखेच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर यांनी लेखन केलेल्या दोन पुस्तकाचे प्रकाशन अगदी थाटात करण्यात आले. त्यानंतर दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीच्या वृत्तनिवेदिका, सुप्रसिध्द निवेदिका ज्योती आंबेकर यांचे भाषण कला शिबीर हे शिबीर आणि महिलांसाठी राज्यस्तरीय पाककला शिबीर त्याचबरोबर सोलापूरचे सुपुत्र असलेले राज्याच्या आणि देशाच्या राजकारणातील सोलापूरच्या सुपुत्रांच्या मुलाखतीचा कार्यक्रम सोलापूर रंगे नेत्यांच्या संगे, महाकवी गदि माडगुळकर यांच्या स्मृती निमित्त काव्य जागर कार्यक्रम, महिलांसाठी श्रावण महोत्सव, श्री सूक्त ते राष्ट्र सूक्त, कवी अशोक नायगावकर यांच्या कवितांचा कार्यक्रम, बागेश्वरधामचे महाराज बागेश्वरबाबा यांचे प्रवचन असे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यातूनच बुधवार दि. १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.२५ वाजाता शिवछत्रपती रंगभवन येथे पद्मश्री उज्वल निकम यांच्या प्रकट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून नागरीकांनी मोठ्यासंख्येने उपस्थिती राहावे असे आवाहनही यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष प्रा.दीपक देशपांडे, कार्यवाह जितेश कुलकर्णी,कोषाध्यक्ष अमोल धाबळे,कार्यकारणी सदस्य प्रकाश मोकाशे, पृथा हलसगीकर, मेधा कुलकर्णी, अभय जोशी, अविनाश महागांवकर, प्रसिध्दी प्रमुख विनायक होटकर आदी कार्यरत आहेत.

## जागतिक बँकेचा पैसा महिलांमध्ये वाटला

(पान १ वरून..) पुन्हा सत्तेत आले नाही तर पुढील निधी थांबवला जाईल असा संदेश महिलांमध्ये पसरवला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. बिहारच्या राजकारणात महिला निर्णायक भूमिका बजावत आहेत. मागील अनेक निवडणुकांमध्ये महिलांचे मतदान पुरुषांपेक्षा जास्त झाले आहे आणि म्हणूनच महिला कल्याण सरकारी उपक्रमांमध्ये आघाडीवर आहे. गॅस, आरोग्य, रेशन आणि थेट रक्कम यासारख्या योजनांमुळे महिला मतदारांमध्ये सरकारवर विश्वास निर्माण झाला आहे, ज्याचा परिणाम यावेळीही निकालांवर झाला. ते याचे श्रेय निवडणूक अर्थशास्त्राला देतात, जिथे आर्थिक मदत आणि राजकीय निर्णय थेट जोडलेले आहेत. वर्मा म्हणाले की, मोदी यांनी स्वतः मोफतच्या राजकारणावर वारंवार टीका केली आहे. तथापि, बिहार निवडणूक प्रचार, जिथे मोठ्या प्रमाणात पैसे थेट महिलांच्या खात्यात हस्तांतरित केले गेले, ते राजकीय फायद्यासाठी वापरले जाणारे एक समान तंत्र होते. त्यांनी सांगितले की हा विरोधाभास सामान्य जनतेमध्ये चर्चेचा विषय बनला आणि त्यातून एनडीएला निवडणूक फायदा मिळाला.

जन सूरजच्या पराभवाबाबत, असाही आरोप करण्यात आला की प्रशांत किशोर यांनी सत्तेत आल्यानंतर दारूबंदीत सुधारणा करण्याबद्दल बोलले होते, ज्यामुळे महिला मतदार दुरावले. पवन वर्मा यांनी हा दावा फेटाळून लावला, असे म्हटले की राज्यातील जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात दारू बेकायदेशीरपणे उपलब्ध आहे आणि यामुळे कौटुंबिक समस्या वाढल्या आहेत. त्यांच्या मते, त्याचा थेट महिलांवर परिणाम होतो, म्हणून दारूबंदीचा मुद्दा जन सूरज यांच्या पराभवाचे कारण असू शकत नाही.